ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संशोधन आवश्यक

**वेदश्री विजय थिगळे, Ph. D.**

*कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,सिडको,उत्तमनगर,नाशिक*

*Scholarly Research Journal's* ***is licensed Based on a work at*** *www.srjis.com*

जागतिकीकरणात मराठी भाषा आणि साहित्य नेमके कुठे आहे हे जाणून घेण्यासाठी मराठी साहित्याचे संशोधन अधिक गतीने आणि वास्तवदर्शी दृष्टिने होणे आवश्यक आहे. पण अलीकडे साहित्यकेंद्री व व्यावहारिक मराठीच्या संशोधनाकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष होते आहे अशी ओरड होते आहे ती थांबवायला हवी. आपण आज २१ व्या शतकात म्हणजे माहिती तंत्रज्ञानाच्या अद्ययावत अशा युगात वावरत आहोत.

संशोधन  हे मानवीच्या विकासाचे अपत्य असते असे म्हणतात. प्रत्येक नव्या संशोधनात संशोधन विषयाच्या दृष्टीने कोणती तरी एखादी चळवळ, परिवर्तन किंवा बंडखोरी हाती लागण्याची शक्यता असते. संशोधनातून त्या त्या विद्याशाखांचा विकास होतो. संशोधन हे आधुनिकीकरणाकडे आणि परिवर्तनाकडे घेवून जाणारे महत्वाचे असे साधन आहे. जी ज्ञानशाखा संशोधनाला नाक मुरडत असतील तर ती ज्ञानशाखा आहे त्याच अवस्थेत राहिल. त्यात साचलेपणा येईल. त्याशाखेचा वर्तमानाशी आणि गतकाळाशी संबंध असल्याचे काही सांगता येणार नाही. संशोधनामुळे आपल्याला आपण आणि आपली ज्ञानशाखा जगाबरोबर नेमकी कुठे आणि कशाी आहे याचे भान येते. अस्तित्वाची जाणीव होते. संशोधनाशिवाय काळानुरूप होणारे बदल आपल्यापर्यंत पोहचत नाही. नव्या मूल्यांची ,जाणीवांची, सिध्दांताची, प्रकारांची आणि नव्या वास्तवदर्शी दृष्टिकोनाची ओळख होत नाही. त्यामुळे संशोधनाची आवश्यकता आहे आणि राहणार आहे हे मात्र खरे.

संशोधन जर करावयाचे असेल तर संशोधनासाठी आणि संशोधकासाठी कोणकोणत्या गोष्टी आवश्यक आहेत असा प्रथम विचार आपल्या मनात येतो. या बद्दल मला कुंग झियांग त्सुंग या चायनीज विचारवंताने मांडलेले विचार सांगाावेसे वाटतात. या विचारवंताने कानेर्गी मिलान विद्यापीठात १९८७ साली या विषयावर व्याख्यान दिले होते. ते म्हणतात की, मोठया मानाच्या विद्यापीठात प्राध्यापक आम्ही एका

अमुक विषयावर काम करतो असे जेव्हा सांगतात तेव्हा ते बहुदा त्यांच्या संशोधनावर किंवा त्यांच्या कामावर भिस्त ठेवून असतात. कोणीतरी अमुक काम करीत आहे म्हणजे तेथील समस्या नक्कीच सुटणार किंवा परिस्थितीत नक्की बदल होणार हा विश्वास त्यांना वाटतो आणि तो वाटायला हवा. इथेच त्या संशोधनाची आणि संशोधकांची जबाबदारी वाढते. कारण त्या विषयावर संशोधन होईल आणि काही उपाय योजना हाती लागेल आणि समस्येवर मात करता येईल. या त्यांच्या सांगण्यातच मला वाटतं संशोधनाचे उद्दिष्ट दडलेले आहे. हे उद्दिष्ट साध्य होणं म्हणजे संशोधनाचे काम त्या दर्जाचे व्हायला हवे. दर्जेदार संशोधन आणि संशोधक हे त्या विद्यापीठाची संपत्ती असते. हेच संशोधक पुढे मार्गदर्शक होणार असल्याने हा संशोधनाचा दर्जा उत्तरोत्तर वाढतच जाणार आणि त्या विद्यापीठाचा नावलौकीक वाढत राहणार यात शंका नाही.

पंडित जवाहरलाल नेहरू विद्यापीठांच्या संदर्भात म्हणत की, 'विद्यापीठे असतात उच्च मानवी मूल्ये. सहिष्णुता, कर्मसिध्दी, साहसी कल्पनांचा मागोवा आणि सत्याचा शोध घेण्यासाठी, मानवजातीचा प्रवास उच्च ध्येयाप्रती नेण्यासाठी विद्यापीठे असतात.त्यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडली तर देश आणि देशवासियांसाठी त्या इतके मौल्यवान काही नाही.'हीच जबाबदारी सध्या विद्यापीठे पार पाडत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपले शिक्षक आणि विद्यार्थी कमी पडु नयेत म्हणून त्यांच्यासाठी त्यांनी संशोधनाचे एक अंगण खुले करून दिले आहे शिवाय काही प्रमाणात निधीही उपलब्ध करून दिला जात आहे. याचे आपण सर्वांनी स्वागतच करायला हवे.

त्यामुळे मराठीच्या विस्ताराचे अनेक मार्ग आज आपल्यापुढे खुले झालेले आहेत. या नव्या तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर संशोधनात करून मराठीचा, साहित्याचा विस्तार आणि प्रचार करणे सहज सुलभ झाले आहे. अडचण आहे ती हे नवे तंत्रज्ञान शिकण्याची आणि त्याचे उपयोजन करण्याची किंवा त्यावरील मजकुराच्या संरक्षणाची. पण तरीही या माध्यमाचा अधिकाधिक उपयोजन करून मराठीच्या विस्तारासाठी संशोधनाचे विविध मार्ग शोधून या संदर्भातील विविध प्रकल्प कार्यान्वित करण्याची गरज आहे. आपल्या संशोधनाची समाजपयोगी मांडणी करण्याचीही आवश्यकता आहे.

मला आठवतं मी जेव्हा माझे गुरूवर्य डॉ. म. सु. पाटील यांना विचारले की 'सर, मला पीएच.डी करावयाची आहे. तर काय करू? यावर त्यांनी चटकन मला विचारले की आतापर्यंत काय लिहिले आहेस आणि कायकाय वाचले आहेस?'मी सांगितले खरे पण ते म्हणाले ज्यावर तुला संशोधन करावयाचे आहे तो विषय निम्मा तरी तुझ्याकडून लिहिला गेला असावा. त्यानंतरच तू पीएच.डी करण्याचा विचार कर. त्यांच्या या अपेक्षीत उत्तराने मी थक्क झाले. पण त्यांना माहित होते या मुलांना आपण घडविले आहे. त्यामुळे राग येणार नाही. आपल्याला समजून घेतील. खरोखरच त्यांच्या सांगण्यात खूप तथ्य होते. अलीकडे आपण

पाहतो अनेक विद्यार्थ्यांना पीएच.डी करावयाची असते पण मौखिक परीक्षेत त्यांनी निवडलेल्या विषयांवरच त्यांनाच बोलता येत नाही. संदर्भ सांगता येत नाही. तेव्हा असे वाटते की संशोधनासाठी घाई तर होत नाही ना? हे त्यांना सांगायला हवे. पण असे सांगणारा मार्गदर्शक त्यांच्या लेखी काय ठरेल हे आपल्याला माहित आहे.

पीएच.डी पदवी प्राप्त करणे आणि बी.ए. व एम.ए. पदवी प्राप्त करणे यात खूप फरक आहे. दोघांतील अभ्यासक्रमातही फरक आहे. पूर्वी आणि आजही एम.फिल. पदवी साठी चार पेपरसाठी परीक्षा द्यावी लागते आणि नंतरच संशोधन विषयाची प्रबंधिका मार्गदर्शकांच्या साहायाने सादर करावी लागते. पण पीएच.डी साठी असे काही पेपर द्यावे लागत नव्हते. पण तरीही संशोधकाचा कस लागत असे.

अलीकडे बोगस पीएच.डी घेणाऱ्यांवर जी शासनाने गदा आणली आहे त्यामागे हे दर्जाहीन संशोधन असावे का? किंवा संशोधनच केलेले नाही असे शासनाला म्हणावयाचे आहे का? दूरदर्शनवर तर एका तज्ञाने हे पीएच.डी चे ग्रंथ म्हणजे गाईडस् आहेत असेही विधान केले आहे. याचा अर्थ काय? संशोधनाचा दर्जा खालावत चालला आहे असे समाजाचे ,तज्ञांचे आणि शासनाचे मत आह का? संशोधनावर महाविद्यालयाचा, विद्यापीठाचा दर्जा आणि मानांकन ठरत असते हे आपल्याला माहित आहे आणि तो उत्तमोत्तम राहावा म्हणूनच विद्यापीठांनी संशोधनाला प्राधान्य दिले आहे हे मात्र खरे. या उत्तम दर्जात सातत्य टिकवून ठेवण्यासाठी विद्यापीठ पायाभूत अभ्यासक्रमावर सातत्याने लक्ष ठेवून असते. पायाभूत अभ्यासक्रम उत्तम ठेवणे हे विद्यापीठाच्या दृष्टिने महत्वाचे असते. त्यामुळे संशोधकांसाठी संशोधनाच्या रूपाने एक आव्हानच उभे राहिले आहे.

गेल्या दोन ते तीन वर्षापासून पुणे विद्यापीठाने पीएच.डी पदवी साठी, काही क्रेडीटसाठी प्रत्येक अभ्यासमंडळाने 'कोर्सवर्क' नेमावा असा आग्रह धरला आणि तो अभ्यास मंडळांनी अस्तित्वात आणला आहे. तो पूर्ण करणे या पीएच.डी पदवीसाठी संशोधन करणा–या अभ्यासकास बंधनकारक आहे. त्यामागचा अभ्यासमंडळाचा हेतू स्वच्छ आहे की संशोधनाकडे वळण्यापूवी अभ्यासकाचे काही वाचन होणे , संशोधन विषयाची खोली कळणे, व्याप्ती–मर्यादा लक्षात येण, .विषयाची आवडनिवडही लक्षात येणे.संशोधनाची दिशा ठरविणे. इथे विद्यार्थ्यांची खरी कसोटी लागते. हे कोर्स वर्क म्हणजे बुध्दीची परीक्षा ठरते.

संशोधनाची अभ्यासपध्दती आणि इतर पदव्यासाठी केल्या जाणारी अभ्यासपध्दती यात मूळातच फरक आहे. संशोधनात खरं तर विद्यार्थ्याची विषयाची आवड, निवड आणि अभ्यासकरण्याची मानसिकता, संदर्भ शोधण्याची तयारी, नव्यांचा शोध घेण्याची आणि आपल्या संशोधनातून मांडण्याची धडपड शिवाय त्याने निवडलेली संशोधन पध्दती यावर त्याच्या संशोधनाचे स्वरूप अवलंबून असते. संशोधन कसे करावे

असे कितीही पुस्तके उपलब्ध असली तरी प्रत्येकाच्या संशोधनाचे स्वरूप सापेक्ष असते त्यामुळे पुस्तकातील सर्वच संशोधन पध्दती जशाच्या तशा आपापल्या संशोधनाला लावून चालत नाही. संशोधनातला प्रत्यक्ष अनुभव काही वेगळाच असतो. इथे 'भाष्यकाराते वाट पुसतु' जायचे असते पण प्रत्येकाचा भाष्यकार आणि त्यांना भेटण्याच्या वाटा हया वेगवेगळया असतात. संशोधनाच्या पाय—या हया सारख्याच असतात पण तरीही प्रत्येकाची पायरी चढण्याची पध्दत, प्रोत्साहन पचविण्याची क्षमता, त्यात असलेली सृजनशीलता ही सापेक्ष असते हे मात्र खरे. खरं तर संशोधन हे जसे शास्त्र आहे तशी ती कलासुध्दा आहे. कारण या संशोधनाच्या पाय—या यंत्रवत न चढता त्या सृजनशीलतेच्या प्रोत्साहनाने चढायच्या असतात. कारण दिलेल्या पुस्तकांमधून आणि ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमांचा प्रत्यक्ष उपयोजनात नेमका कसा उपयोग होईल किंवा तो संशोधक कसा करेल हे मात्र निश्चित सांगता येत नाही. इथे त्याची सृजनशीलता त्याला उपयोगी ठरत असते. हीच खरी त्याच्या कौशल्याची किंवा नैपुण्याची परीक्षा असते. संशोधनात या नैपुण्याची विविधता दिसते म्हणूनच संशोधनाचे आगळेवेगळे महत्व आहे.प्रत्येक संशोधकाची कुवत, आकलन, सृजनशीलता, विचार,कल्पना करण्याची क्षमता व्यक्तीसापेक्ष असते. म्हणून संशोधनातही विविधता दिसते.

संशोधनात एखादी समस्या सोडविणे, नव्या गोष्टींचा किंवा प्रणालींचा शोध लावणे किंवा प्रस्थापित प्रणालींमधील,सिध्दांतामधील,उपयोजन पध्दतीतील कमकुवतता किंवा उणीवा जाणवून देणे, एखाद्या समस्येवर अफलातून उपाय शोधणे, भूतकाळातील ज्ञान हे वर्तमानकाळाशी प्रभावीपणे निगडित असल्याचे सांगणे असे काहीसे संशोधनाचे स्वरूप असते. सर्वच संशोधनासाठी त्या त्या क्षेत्रातील मातब्बर व्यक्ती तुम्हाला भेटतील आणि त्यांचे मार्गदर्शन मिळेलच याची खात्री नसते. कधी कधी ज्ञानाचा झरा आपल्याजवळ नव्हे समोर असतो पण आपल्याला त्या झ—यातील ज्ञानाचे ओंजळभर पाणी मागण्याचे धाडस होत नाही किंवा ते कौशल्य आपल्याजवळ नसेल तर मग कसे होणार? प्रत्येक संशोधनासाठी पुस्तक उपलब्ध असतीलच असे नाही. अशा वेळी अनुभवी ,तज्ञ व्यक्तींच्या अनुभवांचा,त्यांच्या ज्ञानाचा उपयोगही होत असतो. त्यांचे अनुभव आणि आपल्याला आलेले अनुभव पडताळून पाहणे आणि त्यातील निष्कर्ष मांडणे ही सुध्दा संशोधनाची एक प्रक्रियाच आहे. उलट अशा प्रकिया अभ्यासकाचा आत्मविश्वासच वाढवतील. संशोधनाला गती देण्याचे काम करतील. संशोधनाची एखादी नवी प्रणाली अस्तित्वात येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. असे झाले तर त्या संशोधनाचा दर्जा उत्तमच असणार.

हल्ली इंटरनेटवरूनही अनेक संदर्भ उपलब्ध होत असतात. काही संशोधन हे प्रात्यक्षिक पातळीवर होते आणि ते लेखन करण्यासाठी कधी कधी त्या महान संशोधकांजवळ लेखनाचा वेळ नसतो अशा वेळी त्याची चित्रफित करणे आणि ती पदवीसाठी सादर करण्याच्या प्रक्रियेचाही संशोधनात समावेश होतो.

आपल्या संशोधनाचा हेतू जसा आपल्याला माहित असतो तसा त्याचा उपयोग आणि संभाव्य परिणामही आपल्याला माहित असावे. संशोधन प्रक्रियेत आपले संशोधन इतरांपेक्षा वेगळे कसे होईल ते पाहावे. ते करतांना इतरांच्या मतमतांतरांचा विचार करून, ग्रंथातील संदर्भांचा आधार घेत, आपल्या मताच्या स्पष्टीकरणासाठी दिलेले पुरावे, दाखले देत आपला शोध इतरांना पटवून द्यायचा असतो. हे सारं करतांना आपला संशोधनाचा प्रवास सहज सुलभ असा नसतो. यात अनेक अडचणी उभ्या राहतात. कधी ग्रंथांची उपलब्धी होत नाही, कधी योग्य त्या तज्ञांची मुलाखत घ्यावयाची असेल तर तो वेळेवर भेटत नाही. कधी मार्गदर्शकांची भेटीची वेळ मिळत नाही. कधी काही मार्गदर्शक जाणीवपूर्वक तपासायला दिलेली प्रकरणे उशीरा तपासून देतात तर कधी ते इतके व्यस्त असतात की तपासलेल्या प्रकरणावर चर्चा करण्यासाठी त्यांचाकडे वेळ नसतो. त्यांनी व्यक्त केलेली सर्वच मते संशोधकाला पटतातच असे नाही. कधी महिला संशोधकाचे मार्गदर्शक असतील तर महिलांच्या अनेक सामाजिक , संसारिक, कौटुंबिक  अशा अनेक अडचणी असतात. पण अभ्यासकाने या सर्वांवर पर्याय शोधून अडचणींवर मात करून आपले संशोधन महत्वाचे मानावे अन् अध्ययनावर लक्ष केंद्रित करावे. आपल्या संशोधनाचे नियोजन निश्चित असावे. अगदी आठवडयानुसार त्याचे नियोजन करावे. वेळ मिळेल, पुस्तके मिळतील तसे संदर्भ शोधून हे संदर्भ कार्डावर नोंदवून ठेवावेत. प्रकरण लेखनावेळी पुस्तके जवळ बाळगण्याऐवजी हे संदर्भकार्ड वापरणे सुलभ होते. सर्व संदर्भाचा विचार करून आपल्या संशोधन विषयाबद्दलची आपली मते स्पष्ट व्यक्त करायची असतात. कारण त्यावरच तुमचे निष्कर्ष अवलंबून असतात. योग्य निष्कर्ष काढता येणे ही संशोधनातील अत्यंत महत्वाची पायरी असते. निष्कर्ष निश्चित होत आले की आपले संशोधन अंतिम टप्प्याकडे वाटचाल करू लागल्याच्या त्या पाऊलखुणा असतात.

आपण काढलेल्या निष्कर्षांची चर्चा आपल्या मार्गदर्शकांशी करावी. अनुभवी व्यक्तींशी करावी. जमल्यास आपले संशोधन मार्गदर्शकांकडून प्रमाणित करून संक्षीप्त प्रमाणात  प्रसिध्द करावेत. त्यावर चर्चा घडवून आणावी. आपल्या मताविरूध्द मते व्यक्त झालीत तरी राग मानू नये. ती ही स्वीकारावीत. आपण आपले अध्ययन आणि आपण संशोधनासाठी निवडलेला विषय जेव्हा एक होतो तेव्हा संशोधनाला गती येते. आपण अनेक अडचणींमधून मिळवलेले ज्ञान संशोधनात नेमके कोणत्या जागी उपयोगी आणता येईल याचा गांभीर्याने विचार करावा. आपल्या संशोधन प्रवासात आपल्या विषयाबद्दल आपल्याला पडणा—या अनेक प्रश्नांच्या आकलनशील उत्तरांचा शोधही आपण घ्यायला हवा. हा शोध जितका प्रभावी तितकी आपल्या संशोधनला गती अधिक येते. प्रश्नांची जटिलता जितकी अधिक असेल तितका शोध अधिक प्रभावी होतो. आपल्या संशोधनाबद्दल इतरांच्या मनात सतत जिज्ञासा निर्माण व्हावी आणि ते जाणून

घेण्यास उत्सुक व्हावे अशा पध्दतीने आपल्या संशोधन विषयाची मांडणी करून ते प्रबंधरूपाने सादर करावे. प्रबंध लेखनातही भाषाशुध्दीची काळजी घ्यावी. संदर्भ सूची नीट लिहावी. प्रकरणाअंती संशोधनाशी निगडित असलेली परिशिष्टे जोडावीत. संदर्भ ग्रंथ सूची द्यावी. मुलाखतीची संहिता, महत्वाचे फोटो, हस्तलिखिते, अप्रकाशित साहित्य जोडावे. अर्थात ही परिश्ष्टिांची सामग्री संशोधन व व्यक्तीसापेक्ष असेल.

भविष्यकाळात मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या संशोधनाच्या दृष्टिने दीर्घकालीन नियोजनासाठी एकत्र संशोधन माहिती असेलेली सूची तयार होणे गरजेचे आहे. म्हणजे आपल्याला मराठी संशोधनाच्या वाटांचा मागोवा घेता येईल आणि जागतिकीकरणात मराठी साहित्याच्या संशोधनाची पावले कशी पडत आहेत याचा आलेख मांडता येईल.